# 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' पुरस्कार २०२४ पर्वाचे आयोजन

पुणे : क्विक हील फाऊंडेशन या जागतिक सायबर सुरक्षा सोल्यूशन्स प्रदाता क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेडच्या सीएसआर शाखेने पुण्यात 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' पर्वाचे आयोजन केले. या समारोहामध्ये शैक्षणिक संस्था, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय प्रयत्नांना प्रशंसित करण्यात आले, ज्यांनी त्यांचा प्रमुख उपक्रम 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' 'मध्ये सहभाग घेतला. क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती अनुपमा काटकर, जळगाव येथील कवियित्री बहीणाबाई चौधरी नॉर्थ महाराष्ट्र युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रो. व्ही. एल. महेश्वरी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रो. (डॉ.) प्रकाश ए. महानवार, महाराष्ट्र सायबरचे पोलीस अधीक्षक श्री. संजय शिंत्रे आणि २९ सहभागी संस्थांमधील शिक्षणतज्ज्ञ या कार्यक्रमाला उपस्थित होते.

'सायबर सुरक्षेसाठी 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रमाचा जनतेमध्ये, विशेषत: समजाच्या वंचित समुदायांमध्ये सायबर सुरक्षिततेचे महत्त्व आणि डिजिटल विश्वामध्ये पालन करावयाच्या सर्वोत्तम पद्धतींबाबत जागरूकता निर्माण करण्यासह त्यांना शिक्षित करण्याचा मनसुबा आहे. या उपक्रमाने ४७ लाखांहून अधिक विद्यार्थी, शिक्षण आणि सामान्य व्यक्तींना स्थानिक शैक्षणिक संस्थांसोबत सहयोग व पथनाट्यांच्या माध्यमातून सायबरसुरक्षेच्या विविध पैलूंबाबत जागरूक केले आहे, जसे सायबर धोके ओळखणे, सायबर हायजिनचा सराव करणे, सायबर कायदा व सायबर नैतिकेचे पालन करणे. याच उपक्रमांतर्गत फाऊंडेशनने 'अर्न अँड लर्न' उपक्रम लाँच केला, ज्याचा देशातील तरूणांना सक्षम करण्याचा मनसुबा आहे. हा उपक्रम विद्यार्थी स्वयंसेवकांना देशाचे भावी लीडर्स बनण्यासाठी त्यांचे कौशल्य अधिक निपुण करण्यास साह्य करण्यासह प्रशिक्षण देतो. हे विद्यार्थी सर्वात सर्जनशील पद्धतीने मोठ्या प्रमाणात समुदायांमध्ये सायबर सुरक्षिततेबाबत जागरूकतेचा प्रसार करतात. गेल्या वर्षी या उपक्रमाने ८ लाखांहून अधिक व्यक्तींच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. या पुरस्कारांसाठी नामांकन महाराष्ट्र व कर्नाटकमधील ६ झोन्स सहभागी झाले. कृती, क्रियाकलाप व पोहोच प्रयत्नांसंदर्भात महाविद्यालयांकडून मिळालेल्या डेटाच्या आधारावर सायबर सुरक्षा वॉरियर्स (विद्यार्थी), सायबर सेफ्टी चॅम्पियन्स (शिक्षक) आणि सायबर शिक्षा चॅम्पियन ऑफ द इअर (संस्था) या श्रेणींअंतर्गत पुरस्कार देण्यात आले. सायबर वॉरियर्स पुरस्कार ३ श्रेणींमध्ये देण्यात आला - बेस्ट प्रोसेस कम्प्लायन्स, हायेस्ट आऊटरीच अँड इम्पॅक्ट आणि आऊटस्टॅंडिंग परफॉर्मन्स, तर सायबर सेफ्टी चॅम्पियन्स पुरस्कार २ श्रेणींमध्ये देण्यात आला - बेस्ट प्रोसेस कम्प्लायन्स आणि एक्स्ट्रा माइल रेकग्निशन. सायबर शिक्षा चॅम्पियन्स पुरस्कार ३ श्रेणींमध्ये देण्यात आला .




## सर्वोत्तम परिणामांना सादर करताना अभिमान वाटत आहे.

याप्रसंगी मत व्यक्त करत क्विक हीलच्या ऑपरेशनल एक्सलन्सच्या प्रमुख आणि क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती अनुपमा काटकर म्हणाल्या, ''मला आमच्या सीएसआर उपक्रमांच्या सर्वोत्तम परिणामांना सादर करताना अभिमान वाटत आहे. या उपक्रमांनी ५० लाखांहून अधिक व्यक्तींच्या, विशेषत: देशाच्या दुर्गम भागांमध्ये राहणाऱ्या व्यक्तींच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' पुरस्काराच्या २०२४ एडिशनच्या माध्यमातून या उपलब्धीला साजरे करण्यासारखा दुसरा उत्तम मार्ग नाही. हा महत्त्वपूर्ण समारोह जनतेपर्यंत सायबर सुरक्षेचा महत्त्वपूर्ण संदेश प्रसारित करण्याप्रती कटिबद्धता दाखवलेल्या स्वयंसेवी संस्था, समर्पित शिक्षक आणि उत्साही विद्यार्थ्यांच्या बहुमूल्य योगदानाला प्रशंसित करतो. तसेच या समारोहामधून आपल्या देशाचे भावी लीडर्स म्हणजेच तरूणंना प्रेरित व सक्षम करण्याप्रती आमची अविरत कटिबद्धता देखील दिसून येते.